ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार ५ ऑक्टोबर, १९६६ | अंक १९




नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

ठाकरसी फॅब्रिक्स्

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड ·SANFORIZED·



THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रूप

• धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.

• धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TH-36 MR

## जपानची आर्थिक भरभराट

गेल्या दहा वर्षाच्या काळात जपानची औद्योगिक भरभराट वेगाने झाली आहे. आशियांतील अविकसित देश कमीअधिक वेगाने प्रगती करीत असले तरी जपानच्या प्रगतीचा वेग बराच मोठा आहे. विशेषत: औद्योगिक क्षेत्रात जपानचा विकास अतिशय झपाट्याने होत आहे. त्या मानाने शेतीची प्रगती मात्र तितक्या वेगाने झालेली दिसत नाही. जपानमधील ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती स्थिर राखण्यासाठी जपानला निर्यातीवर कर द्यावा लागतो. पण आवश्यक तितकी निर्यात करण्याचे जपानला अजून जमत नाही. तथापि, ह्या भरभराटींतही काही बाबतीत समतोल आढळून येत नाही. विजेच्या वस्तू तेथे फार स्वस्त आहेत; पण अन्नपदार्थ मात्र विलक्षण महाग आहेत. जपानच्या अर्थव्यवस्थेत आढळून येणाऱ्या अशा प्रकारच्या विसंगतीची किंमत त्याला मधूंन मधून द्यावी लागते. अर्थव्यवस्थेला मधून मधून तीव्र मंदीच्या झटक्यांना तोंड द्यावे लागते आणि अनेक लोकांना आर्थिक अनिश्चिततेचा कटु अनुभव भोगावा लागतो. तथापि, ह्या मंदीच्या काळातून पुन्हा डोके वर काढण्याइतकी ताकद जपानच्या अर्थव्यवस्थेत अजून तरी आढळून येत आहे. जपानमधील आधुनिक पद्धतीच्या झकपक रेल्वेगाड्या देशाच्या प्रेक्षणीय वैभवात मोडतात. टोकिओ आणि ओसाका ह्यांच्या दरम्यान ह्या अद्ययावत एक्सप्रेस गाड्या दर तासाला १५० मैल वेगाने धावत असतात. तरी प्रवाश्यांना गाडीचा वेग कळूनसुद्धा येत नाही. ह्या गाड्यांत अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करण्यात आलेला आहे.

---


## खनिजांच्या वाहतुकीसाठी नव्या रस्त्यांची बांधणी

४ थ्या पंचवार्षिक योजनेत खनिजांच्या निर्यातीसाठी ठरविण्यात आलेले उद्दिष्ट गाठणे कठीण जाणार असल्याचे दिसत आहे, आणि ह्याचे कारण म्हणजे खनिजांच्या खाणीपर्यंत पोचणाऱ्या रस्त्यांची अपुरी व्यवस्था. नियोजन समितीच्या वाहतूक गटाचे लक्ष ह्या अडचणीकडे गेले आहे. खनिजांच्या खाणी असणारे देशाचे भाग रेल्वे रस्त्याला जोडणे नेहमीच सोयीस्कर असते असे नाही. खनिजांच्या वाहतुकीची व्यवस्था नीट करण्यासाठी १० कोटी रुपये खर्चून अतिशय जरूरीचे असे नवे रस्ते बांधण्याच्या एका योजनेचा विचार वाहतूक गटातर्फे सध्या चालू आहे. सध्या खाणी विभागांतील रस्ते अगदी वाईट स्थितीत आहेत. काही भागांत तर अद्याप रस्तेच नाहीत. ओरिसामध्ये ही परिस्थिती विशेष जाचक आहे. त्या रस्त्यांतील खनिज संपत्तीचा अपुऱ्या रस्त्यांच्या अभावी देशाला मिळावा तसा फायदा मिळत नाही. ओरिसामधील खाणींचे उत्पादन पूर्णांशाने चालू ठेवण्यासाठी ४०५ मैल लांबीच्या रस्त्यांची आवश्यकता आहे. इतक्या लांबीचे रस्ते बांधण्यासाठी सुमारे ६.६ कोटी रुपये खर्च येईल. म्हैसूर राज्यातील खाणींच्या प्रदेशांतही सुमारे ३०० मैल लांबीचे रस्ते लवकरात लवकर बांधणे आवश्यक आहे. म्हैसूर राज्यांतील रस्त्याची सुधारणा करण्याकडेही लक्ष देणे अगत्याचे आहे. ह्या कामासाठी खर्चही ९० लाखांच्या आसपासच येईल. सर्व राज्यांत सुमारे १० कोटी रुपये खर्चून नवे रस्ते बांधणे व जुन्यांची दुरुस्ती करणे जरूर आहे. ह्या कामी खाणी मालक आणि राज्य सरकारे ह्यांच्या सहकार्याची गरज आहे. त्यांच्या सहकार्याच्या अभावी रस्तेबांधणीच्या कामात अडचणी उत्पन्न होतील.




धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...

परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेंच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर
डिझेल एंन्जिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY KO: 667-A MAR

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-१९३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# अर्थ

बुधवार, ५ ऑक्टोबर, १९६६



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## झपाट्याने वाढणारी शहरे आणि ग्रामीण विभाग

वॉशिंग्टन येथे समाजकार्याविषयीची १३ वी आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यात आली होती. परिषदेला भारत सरकारच्या प्रतिनिधी मंडळाच्या पुढारी म्हणून श्रीमती व्ही. एम्. चंद्रशेखरन् ह्या हजर होत्या. भारत सरकारच्या समाजहित खात्याच्या त्या उपमंत्री आहेत. परिषदेचे काम आठवडाभर चालले होते. आधुनिक उद्योगप्रधान समाजरचनेत सर्वच देशांतून शहरांची वाढ झपाट्याने होत असून त्यांच्याभोवती ग्रामीण भागाचा वेढा पडलेला असतो. ग्रामीण भाग सर्वच बाबतींत मागासलेला आणि शहरे पुढारलेली, असा प्रकार दिसून येतो. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी कम्युनिस्ट चीनच्या राज्यकर्त्यांनी एका नव्याच विचारसरणीचा आश्रय केला आहे. त्यांच्या मताने जगातील अविकसित व मागासलेले देश आणि पुढारलेले उद्योगप्रधान देश ह्यांच्यात शहरी व खेड्यांसारखाच विरोध आहे. म्हणून अप्रगत देशांनी पुढारलेल्या देशांची अडवणूक व नाकेबंदी करून जागतिक क्रांती घडवून आणता येणे शक्य आहे. चीनच्या राज्यकर्त्यांच्या ह्या बैठकीला त्यांच्या अनुभवाचा थोडाबहुत आधार आहे. कारण, चीनमधील कम्युनिस्ट क्रांती प्रथम ग्रामीण भागात जोपासली गेली व नंतर तिने शहरे जिंकून घेतली. एक राजकीय विचारप्रणाली म्हणून तिच्या व्यवहार्यतेची कसोटी आंतरराष्ट्रीय रंगमंचावर अद्याप व्हावयाची आहे. तथापि, अविकसित आणि पुढारलेल्या अशा दोन्ही देशांतून शहरांची अमर्याद वाढ होत असून त्यामधून आगापिछा नसलेल्या व म्हणून बेदरकार वृत्तीच्या लोकांची संख्या भयप्रद रीतीने वाढत चालली आहे, ही गोष्ट अमेरिकेतील एका प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञानेही नुकतीच सांगितली आहे. अशाच परिस्थितीतून एखादा नवा हुकूमशहा अवतीर्ण होत असतो.

जगातील लोकसंख्या आज सुमारे ३०० कोटींच्या घरात असून त्यापैकी एकतृतीयांश लोकसंख्या शहरांतून केंद्रित झालेली आहे. शहरी भागात लोकसंख्येची वाढ एखाद्या स्फोटमालिकेसारखी होत आहे. त्यातही अविकसित देशांतील वाढत्या शहरांची समस्या अधिक बिकट आहे. कारण, ह्या देशांतील साधनसामग्री मर्यादित आहे आणि त्या मानाने औद्योगीकरणाची गती जोराची आहे. गेल्या ३० वर्षांच्या अवधीत कलकत्ता, मुंबई आणि मद्रास ह्या शहरांची लोकसंख्या सरासरी २०० टक्क्यांनी वाढलेली आहे. इतक्या वेगाने वाढणाऱ्या लोकांच्या प्राथमिक सोईंची व्यवस्था करणे सुद्धा अशक्य झालेले आहे. अर्थातच गलिच्छ वस्त्या नव्याने उत्पन्न होत आहेत व दाटीवाटीने राहिल्यामुळे आरोग्यमय स्थितीत राहणे अशक्य होत आहे. हा प्रश्न केवळ अपुऱ्या साधनसामग्रीचा नाही. मोठ्या शहरांतील नागरी जीवनाच्या सोई अगदी अल्पावधीत करण्यात आल्या पाहिजेत. नाहीतर बाका प्रसंग ओढवण्याचा धोका सतत वाढत आहे. शहरांत होणारी लोकांची गर्दी हटविण्यासाठी, निदान ती बेतात राखण्यासाठी, ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची वाढ करण्यात आली पाहिजे. तसे झाल्यास शहराकडे येणारा लोकसंख्येचा ओघ काही प्रमाणात तरी कमी होण्याचा संभव आहे. शहरी जीवनाची ओढ एकदा लागली म्हणजे शहरात आलेला कोणताही माणूस परत जात नाही. ग्रामीण जीवनात शहरात आढळून येणाऱ्या सुखसोई उपलब्ध करून देण्यासाठी तेथे उद्योगधंद्यांची उभारणी करावी लागेल; मगच शहरी व ग्रामीण विभागांतील सध्या जाणवणारी तफावत कमी करता येणे शक्य होईल आणि देशाच्या जीवनातील हे दोन आवश्यक विभाग एकमेकाशी निकटपणाने जोडले जातील.

---

## जो चेक लिहीत गेला, त्याचा पैसा खलास झाला !

चेकने पैशाचे व्यवहार करण्याची पद्धत आता सगळीकडे पसरत आहे. सेव्हिंग्ज खात्यालाही चेकची सवलत दिल्यामुळे चेकचा वापर वाढण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. चेक पोस्टाने पाठवता येतो; तो गहाळ झाला तर तो रद्द करून दुसरा देता येतो. नेहमीचे दुकानदार चेक स्वीकारण्यास तयार असतात. अशा रीतीने, घरात किंवा खिशात मोठी रक्कम बाळगण्याचे कारण उरत नाही.

चेक इतका उपयुक्त असला, तरी तो कधीकधी दगाही देणारा ठरतो. अर्थात चेक दगाबाज नसून, चेक-बुक धारण करणाराचे मन त्याला दगा देत असते. कसे ते पाहा:—

चेक लिहायला वेळ लागत नाही. पण आपण चेक देतो तेव्हा खरोखर प्रत्यक्ष पैसे देत असतो, हे ध्यानात येत नाही. आपल्या खात्यात किती शिल्लक आहे, हे न पाहताही चेक लिहिला जातो, आणि महिनाअखेर बँकेचे स्टेटमेंट आले म्हणजे मात्र आपल्याला धक्का बसतो; शिल्लक उरलेलीच नसते. हे सर्व कशामुळे होते ? चेक लिहिण्याच्या बाबतीत विवेक न पाळल्यामुळे; चेक लिहून त्याचा विसर पडल्यामुळे; नीटहिशेब न ठेवल्यामुळे.

चेक-बुक कुलपाच्या बंदोबस्तात ठेवून, जरूर पडेल तेव्हाच ते काढून घ्यावे. बाहेर पडताना चेक-बुक बरोबर घेतलेले नसले म्हणजे न परवडणारा जिन्नस खरीदण्यास थोडातरी आळा बसतो. बँकेतल्या कॅशिअरकडून कोरा चेक घेऊन त्याचा उपयोग केला, तर हा व्यवहार आपल्या चेक-बुकात नोंदण्याचे राहून जाते आणि बँकेलाच आपली शिल्लक कमी दाखविल्याबद्दल आपण दोष देतो. आपली सही असलेला चेक आपल्यापुढे आणून टाकला म्हणजे आपले तोंड बंद होते. चेक-बुकातील चेकच्या कौंटरफॉइलवर आपण बाकी ओढीत गेलो, म्हणजे आपण जागरूक राहतो.

थोडक्यात म्हणजे, ज्याला चेकबुक नियंत्रणाखाली ठेवता येईल, त्याला खर्चही आवाक्यात राखता येईल.

## पाकिस्तानातील चित्रपट धंद्याच्या अडचणी


१९४७ साली भारताची फाळणी झाली त्यावेळी चित्रपटांचा धंदा मुख्यत: मुंबईत केंद्रित झालेला होता. अर्थातच पाकिस्तानला ह्या धंद्याची मुहूर्तमेढच रोवावी लागली. तथापि पाकिस्तान धंद्याची वाढ करण्याचे जोराचे प्रयत्न करीत आहे. गेल्या वर्षी भारत व पाकिस्तान ह्यांच्यात संघर्ष झाल्यापासून पाकिस्तानने हिंदी चित्रपट पाकिस्तानात दाखविण्यास बंदी केली. हा सशस्त्र संघर्ष होण्यापूर्वीही हिंदी चित्रपटांवर बरीच बंधने लादण्यात आलेली होती. नव्या चित्रपटांच्या आयातीला बंदी घालण्यात आलेली होती आणि जुन्या चित्रपटांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली होती. तरीसुद्धा सुमारे १,११० हिंदी चित्रपट पाकिस्तानात दाखविण्यांत येत असत आणि ते लोकप्रियही झाले होते. गेल्या सप्टेंबरमध्ये हिंदी चित्रपटांवर बंदी घालण्यात आल्यामुळे पाकिस्तानात चित्रपटांचा तुटवडा अधिकच जाणवू लागला. पाकिस्तानी निर्माते तो भरून काढण्याची खूप खटपट करीत आहेत. पण हे काम अवघड आहे. पाकिस्तानात पहिल्या प्रतीच्या नटांची अगर नट्यांची संख्या ८ ते १० पेक्षा अधिक नाही. त्यामुळे त्यांना एकाच वेळी आठआठ चित्रपटांत कामे करावी लागतात. अर्थातच निर्मात्यांना त्यांच्या तारखा संभाळता संभाळताच पुरेवाट होते. नटनटींप्रमाणेच रजतपटासाठी लागणाऱ्या कथांचीही वाण आहे. साहजिकच भारतामधील चित्रपटांच्या कथानकांची उसनवारी करण्याकडे कल दिसून येतो. पाकिस्तानातील निर्मात्यांना नट्या मिळणे दुरापास्त झाले आहे. खानदान घराण्यांतील तरुणी नट्यांचा पेशा स्वीकारणे अशक्यच असते. मग निर्मात्यांना खालच्या वर्गातून अगर वेश्यांमधूनही नट्या मिळवाव्या लागतात.

---

## आग्नेय आशियातील देशांचे निराशाजनक आरोग्य

जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिया प्रादेशिक समितीचा आरोग्यविषयक वार्षिक अहवाल तयार झाला आहे. ह्या अहवालात आग्नेय आशियात मोडणाऱ्या देशांतील आरोग्यविषयक परिस्थितीचे जे चित्र रेखाटण्यात आले आहे ते निराशाजनक आहे. संबंधित देशांतील आरोग्यविषयक परिस्थिती अतिशय सदोष असून संसर्गजन्य रोगांचा प्रसारही मोठ्या प्रमाणावर आहे. ह्या देशांचा आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. परंतु संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव आणि प्रसार ह्या प्रयत्नांना फार अडचणी उत्पन्न करीत आहेत. आरोग्यासाठी करण्यात येणाऱ्या उपायांपैकी सर्वांत अधिक उपाय संसर्गजन्य रोगांविरुद्ध करावे लागत आहेत. त्यामुळे संघटनेच्या पैशांपैकी बराच पैसा ह्या बाबींवर खर्च होतो. ह्या बाबतींत काही वर्षांत करण्यात आलेले काम फारसे समाधानकारक नाही. गेल्या वर्षी देवीच्या रोगाच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यात विशेष प्रगती करता आली नाही. पटकीचा रोग तर पसरतच चाललेला आढळून आला आणि प्लेगच्या उद्भवाचे भय कधीही समूळ नाहीसे करता आले नाही. अनेक देशांनी क्षयप्रतिबंधक मोहिमा हाती घेतलेल्या आहेत. परंतु त्यांना अजून यावी तशी गती आलेली नाही. हिवतापाच्या निर्मूलनाबाबत मात्र बरीच आघाडी मारण्यात आली आहे. ह्या देशांतील आर्थिक परिस्थिती सुधारल्याशिवाय आरोग्यरक्षक योजनांची लक्षात भरण्यासारखी प्रगती होणार नाही आणि आरोग्यवर्धक भौतिक परिस्थिती निर्माण करण्यास लागणारा खर्च ह्या देशांच्या आवाक्याबाहेर आहे, असा अभिप्राय अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)




दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी : सातारा (महाराष्ट्र)

## युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा
### जनरल मॅनेजर श्री. सी. ह. जोशी ह्यांच्या निरोपाचा समारंभ

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा ह्या संस्थेचे जनरल मॅनेजर, श्री. सी. ह. जोशी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त संचालक मंडळाने त्यांना निरोप दिला. प्रारंभी संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. रा. ना. गोडबोले म्हणाले, "श्री. जोशी यांची भूमिका संस्थेच्या हिताला योग्य अशीच व निःस्पृहपणाची होती. कर्तव्यदक्ष व प्रामाणिक अशी त्यांची आदर्श व्यवस्थापकाची भूमिका सगळ्यांनाच मार्गदर्शक होती. ज्येष्ठ संचालक, श्री. भाऊसाहेब मोडक यांनींहि श्री. जोशी यांचे कार्याचा गौरव केला. संस्थापक कै. आण्णासाहेब चिरमुले यांनीं सेवानिवृत्तिनंतर संस्थेशी ठेवलेल्या संबंधाप्रमाणे श्री. जोशी यांनी संबंध ठेवावेत, असे सांगून संचालक मंडळाचे वतीने श्री. जोशी यांना सदिच्छा व्यक्त केल्या.

संचालक मंडळाचे वतीने श्री. गोडबोले यांनी चांदीचे ताटवाटी, भांडे, शाल व श्रीफल श्री. जोशी याना अर्पण केले.

श्री. जोशी यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. एक संचालक, श्री. गोपाळराव पालकर यांनी आभार मानले.

### वनस्पतिशास्त्रज्ञांचे महत्त्वाकांक्षी प्रयत्न

मॉस्को येथील शेती संस्थेतील वनस्पती विभागाचे प्रमुख भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. मद्रास विद्यापीठाच्या वनस्पती विभागातर्फे त्यांचे व्याख्यान झाले. व्याख्यात्यांनी रशियातील वनस्पतिशास्त्रज्ञांच्या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांची काही माहिती सांगितली. ते म्हणाले की रशियन शास्त्रज्ञांनी जंगली गवतापासून एका नव्या प्रकारच्या गवताची पैदास केली आहे. हे गवत नेहमीच्या गवतापेक्षा अधिक सकस असून गुरांना चांगले मानवते. रशियाच्या उत्तरेकडील प्रदेशात पिकू शकतील अशा प्रकारच्या फळांच्या नव्या जाती शोधून काढण्याचेही प्रयत्न सध्या चालू आहेत. त्याचप्रमाणे टोमॅटो, काकड्या आणि कांदे ह्यांच्या नव्या जातीची पैदास करण्याचा खटपट चालू आहे. नव्या जाती आर्थिक दृष्टीने परवडणाऱ्या असतील अशी अपेक्षा करण्यात येत आहे.

### म्हैसूर राज्यात मच्छीमारीच्या धंद्याचे केंद्र

म्हैसूर राज्याच्या दक्षिण कॅनरा किनाऱ्यावर मच्छीमारीचे एक केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्याच्या स्थापनेसाठी १·२५ कोटी रुपये खर्च येणार आहे. केंद्रांत दरसाल १५ हजार टन माशांची पैदास होऊ शकेल असा अंदाज आहे. हे केंद्र सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणार असून त्याचा फायदा सुमारे ११ हजार कोळ्यांना मिळेल. दक्षिण कॅनराचा किनारा १३० किलो मीटर लांब असून नजीकच्या समुद्रात अनेक प्रकारचे मासे व इतर खाद्य जलचर प्राणी विपुलतेने सापडतात. त्यांच्या निर्यातीमुळे दरसाल सुमारे १८ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होईल.

### झेकोस्लोव्हाकियाची आणखी पाच कोटी सिगारेट्सची ऑर्डर

इंपीरिअल टोबॅको कंपनी ऑफ इंडिया लि. ला झेकोस्लोव्हाकियाकडून पाच कोटी सिगारेट्सची ऑर्डर मिळाली आहे. म्हणजे, आता कंपनीची त्या देशाकडील निर्गत ८·५ कोटी सिगारेट्सची होईल आणि त्यापासून ११ लक्ष रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळेल.

### गुजरात राज्यात आयुर्वेदाला प्रोत्साहन

आयुर्वेद उपचार पद्धतीचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी गुजरात सरकारने मोठ्या प्रमाणावर उत्तेजन देण्याचे ठरविले आहे. राज्यातील आयुर्वेदिक इस्पितळांची संख्या वाढविण्यात येत आहे. १९६० मध्ये राज्यात फक्त एकच आयुर्वेदिक इस्पितळ होते आणि त्यात फक्त १० रोग्यांची सोय होती. आता इस्पितळांची संख्या ७ झाली असून सर्वांत मिळून २०५ रोग्यांची सोय होऊ शकते. आयुर्वेदिक पद्धतीच्या दवाखान्यांची संख्याही ४१ पासून ७१ पर्यंत वाढली आहे. जिल्हा पंचायतीतर्फे चालविण्यात येणारे ३५७ आयुर्वेदिक दवाखाने जमेस धरता दवाखान्यांची संख्या आता ४२८ झाली आहे. जुनागढ येथील औषधालयातर्फे सरकारी व पंचायतीच्या इस्पितळांना औषधांचा पुरवठा केला जातो. त्याशिवाय ग्रामीण भागातील आरोग्यकेंद्रांना औषधांच्या पेट्या पुरविण्यात येतात. एका आयुर्वेद विद्यापीठाची स्थापनाही करण्यात येणार आहे.

### ब्रिटनमधील बेकारांची संख्या वाढत चालली

ब्रिटनमधील बेकारांची संख्या फुगत चालली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान मि. विल्सन ह्यांनी पैसा दुर्मिळ करण्याचे आणि वेतन गोठविण्याचे जे धोरण स्वीकारले आहे त्याचा हा परिणाम असावा असे सांगण्यात येत आहे. येत्या हिवाळ्यापर्यंत ब्रिटनमधील बेकारांची संख्या ६ लाखांपर्यंत वाढेल असा अंदाज करण्यात आला आहे. रोजगारी करण्यास पात्र असलेल्या लोकांशी प्रत्यक्ष बेकारांचे प्रमाण सध्या १॥ टक्का आहे, ते हिवाळ्याच्या सुमारास २·५ टक्के इतके वाढेल. १९६७–६८ च्या हिवाळ्यात तर बेकारांची संख्या ७ लाखांच्या घरात जाण्याची शक्यता आहे. ब्रिटनमधील काही उद्योगधंद्यात कामगारांना आळीपाळीने काम देण्यात येत आहे तर काहीना अपुरे काम मिळत आहे. त्यांचा बेकारांत समावेश करण्यात आलेला नाही.

### रूरकेला कारखान्यातील नवी झोतभट्टी

रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यातील ४ थी झोतभट्टी येत्या डिसेंबरपासून उत्पादनक्षम होईल. सध्या ह्या कारखान्याच्या विस्ताराचे काम चालू असून विस्ताराच्या योजनेप्रमाणेच ही ४ थी भट्टी उभारण्यात आली आहे. भट्टीच्या उभारणीचे बहुतेक काम पूर्ण झाले आहे. भट्टीत दररोज १,५०० टन पोलादाची निर्मिती होऊ शकेल. हिराकूड येथील वीज केंद्रातून कारखान्याला होणारा वीजपुरवठा पावसाच्या कमीअधिक प्रमाणावर अवलंबून असतो. त्यामुळे कारखान्याला पुरवठा कमी पडतो. सध्या विजेचा पुरवठा वाढविण्यासाठी आणखी एक वीजकेंद्र उभारण्यात येत आहे. ते पुरे झाले म्हणजे वीजपुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटेल.

### विशाखापट्टम येथील बंदरांचा विकास

बोटी बांधण्याच्या धंद्यात अग्रेसर असणाऱ्या देशांतून अलीकडे प्रचंड बोटी बांधण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. ह्या बोटी प्रवासी वहातुकीच्या असतात, तशा तेल वाहून नेणाऱ्या अगर खनिजे वाहून नेणाऱ्याही असतात. बोटींच्या आकारात मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याने निरनिराळ्या बंदरांचा विकास करणे आवश्यक होत चालले आहे. भारतामधील बंदरात येणाऱ्या ह्या मोठ्या बोटींसाठी बंदरातील पाण्याची खोली वाढविणे, बोटींना वळसा घेणे सुलभ करण्याची सोय करणे, इत्यादी कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहेत. पूर्व किनाऱ्यावरील विशाखापट्टम बंदरात अशा अनेक प्रकारच्या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्या पूर्ण झाल्यावर बंदरात ५० हजार टन वजनाच्या खनिजे वाहणाऱ्या बोटी ये-जा करू शकतील.

### श्रीमंतांच्या मुलांसाठी लढण्याची गरीब मुलांवर सक्ती का म्हणून ?

व्हिएटनाममधील अमेरिकन लष्करी कारवाईला अमेरिकन विद्यार्थ्यांचा विरोध वाढत चालला आहे. लष्करभरतीच्या पद्धतीमुळे त्यांच्यात असंतोष पसरला आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांपैकी वरच्या ५०% विद्यार्थ्यांना लष्करभरतीची माफी आहे. त्याचप्रमाणे, संरक्षण खात्याने घेतलेली परीक्षा उत्तीर्ण होणारालाही ही माफी मिळते.

येल किंवा हार्वर्डसारख्या विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा इतर विद्यापीठांपेक्षा (उदाहरणार्थ, अलबामा विद्यापीठ) उच्च असतो. तेव्हा, त्या विद्यापीठातील ज्या खालच्या विद्यार्थ्याला लष्करभरतीची माफी मिळू शकणार नाही, तो इतर विद्यापीठांच्या अग्रेसर विद्यार्थ्यापेक्षाही अधिक चांगला असतो !

गरीब, निग्रो मुले विद्यापीठात शिकायला जातच नाहीत; तेव्हा ती आपोआपच लष्करात सक्तीने भरती केली जातात. गरीब निग्रोंना श्रीमंत मुलांसाठी लढणे भाग पाडले जाते. हीच श्रीमंत मुले पुढे गरीब मुलांना नागरी हक्क नाकारण्यात पुढाकार घेणार. निग्रो पुढाऱ्यांची ही तक्रारही महत्त्वाची आहे.

विद्यार्थ्यांच्या तक्रारीस विद्यापीठांच्या अधिकारी वर्गाचा पाठिंबा मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या मार्कांची माहितीच न पुरविण्याचे काही विद्यापीठांनी ठरविले आहे. त्यातही विशेष गोष्ट म्हणजे, अशी माहिती न पुरविणारी दोन विद्यापीठे स्थानिक राज्य सरकारांची आहेत. ब्रुकलिन कॉलेज न्यूयॉर्क शहराच्या विद्यापीठाचा एक भाग आहे, तर मिचिगन विद्यापीठ मिचिगन राज्य सरकारच्या अमलाखाली आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठही ह्या प्रश्नाचा सध्या विचार करीत आहे.

---

### हिराकूद येथे यांत्रिक शेतवाडीची स्थापना

हिराकूद येथे २० हजार एकरांवर पसरलेली यांत्रिक शेतवाडी स्थापन करण्याचा विचार मध्यवर्ती सरकारचे शेतीखाते करीत आहे. रशियाच्या मदतीने भारतात स्थापन करण्यात यावयाच्या १५ यांत्रिक शेतवाड्यांपैकी ती एक आहे. हिराकूद येथे स्थापन होणारी ही शेतवाडी पहिली आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत ह्याच धर्तीवर शेतवाड्या स्थापन करण्यात यावयाच्या आहेत. ह्या बाबतीत ओरिसा सरकारशी मध्यवर्ती सरकारच्या सरकारी शेतवाड्याच्या प्रमुखाची बोलणी चालू आहेत. हिराकूद येथील शेतवाडीचे १० हजार एकराचा एक असे दोन भाग पाडण्यात येणार आहेत. प्रत्येक भागासाठी २ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी ५० लाख रुपये यंत्रसामग्रीसाठी खर्च होतील. नागार्जुनसागर येथेही अशी एक शेतवाडी स्थापन करण्यात येईल.

---

### इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे सुटे भाग

इलेक्ट्रॉनिक उपकरणांत वापरण्यात येणारे अनेक प्रकारचे सुटे भाग तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. हा संकल्पित कारखाना एका पश्चिम जर्मन कंपनीच्या मदतीने फरीदाबाद येथे उभारण्यात यावयाचा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी सुमारे १.२५ कोटी रुपये खर्च येणार असून त्यांपैकी ३७ लाख रुपयांचा खर्च परदेशी चलनात करावा लागणार आहे. जर्मन कंपनी ह्या खर्चाची जबाबदारी स्वीकारणार आहे. कारखाना चालू झाल्यावर दरसाल सुमारे १ कोटी रुपयांचे परदेशीय चलन वाचेल. इलेक्ट्रॉनिक उपकरणांना संरक्षणव्यवस्थेत आणि अंतर्गत दळणवळण व्यवस्थेत वाढत्या महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे.

**रशियाकडून खतांची आयात**—रशियाकडून मिळालेली रासायनिक खते घेऊन दोन बोटी मुरगाव बंदरात दाखल झाल्या आहेत. एका बोटीने ५ हजार टन व दुसऱ्या बोटीने ९ हजार टन खत आणले. आणखी २ हजार टन खत लवकरच आयात होईल. १९६४ पासून पूर्व युरोपीय देशाकडून आयात केलेली खते ह्याच बंदरात उतरून घेण्यात येतात. रशियाकडून आलेली खते मात्र ह्या बंदरात प्रथमच आली आहेत.

**मालट्रक्सची बल्गेरियाला विक्री**—बल्गेरियात भरविण्यात आलेल्या औद्योगिक प्रदर्शनात भारताने आपला माल पाठविला होता. त्यात काही मालवाहू मोटारीही होत्या. बल्गेरियाच्या सरकारला ह्या मोटारी पसंत पडल्याने ५०० मालमोटारी घेण्याचा करार भारत सरकारने बल्गेरियाच्या आयात संघटनेशी केला आहे. मोटारीची किंमत सुमारे २.३ कोटी रुपये होईल.

**भारतामधील अन्नटंचाईचा उल्लेख**—परदेशांना देण्यात येणाऱ्या मदतीचा नीट उपयोग करून घेण्यात येत नाही, अशी तक्रार अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात करण्यात आली. त्या वेळी भारताचे उदाहरण देण्यात आले. १९५१ सालापासून अमेरिकेने भारताला सुमारे ६०० कोटी डॉलर्सची मदत दिली आहे. त्यावेळी भारतापुढे अन्नपुरवठ्याचा प्रश्न होता तसाच तो आज १५ वर्षांनंतरही आहे, अशी टीका करण्यात आली.

**न्यूयॉर्कमधील वेश्या**—न्यूयॉर्कमध्ये वेश्यांची संख्या वाढत चालल्याचे पोलिसांना आढळून आले. चालू वर्षाच्या प्रारंभापासून पोलिसांनी ३,१५० वेश्यांना अटक केली. न्यूयॉर्क शहरातील वेश्यांची लोकसंख्या किती आहे ते नक्की नसले तरी ती १४ ते १५ हजारांपर्यंत असावी.

**बँकॉक येथील व्यापारी जत्रा**—येत्या नोव्हेंबरमध्ये बँकॉक येथे पहिली आशिया आंतरराष्ट्रीय व्यापारी जत्रा भरविण्यात येणार आहे. ह्या मेळाव्यात ४० देशांच्या मिळून ३ हजार कंपन्या आपआपला माल पाठविणार आहेत. परंपरागत निर्यात मालापेक्षा वेगळा माल पाठविण्याच्या दृष्टीने भारताला ह्या जत्रेचा चांगला फायदा होईल.

**कीटकनाशकांचा सहकारी कारखाना**—विदर्भ कोऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, अमरावती येथील औद्योगिक वसाहतीत कीटकनाशक औषधे तयार करण्याचा एक सहकारी कारखाना काढणार आहे. सहकारी विभागात अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना असेल. कारखान्याची यंत्रसामग्री आलेली आहे. कारखान्यांत ४०० टन औषधे तयार होऊ शकतील.

**५० लाख रुपयांचा काळा पैसा**—राजकोट शहरामधील जमिनीच्या खरेदीविक्रीच्या अनेक व्यवहारांबाबत आयकर खात्याने तपास केला असता सुमारे ५० लाख रुपयांचा काळा पैसा उजेडात आला. तपासाची ही पहिली फेरी आहे. गेल्या दोन वर्षांत राजकोट शहरातील जमिनीच्या किमती भरमसाट फुगत चालल्या होत्या. उजेडात आलेल्या पैशावर किमान १० लाख रुपयांचा कर वसूल होणार आहे.

**खिशात मावणारा दूरदर्शक**—लंडनमध्ये काड्याच्या पेटीएवढा पडदा असणारा एक दूरदर्शक दाखविण्यात येत आहे. इतका लहान दूरदर्शक अद्याप जगात तयार करण्यात आलेला नाही. ह्या दूरदर्शकाचा आकार २० सिगारेट्स मावणाऱ्या पाकिटापेक्षा थोडा मोठा आहे. त्याची किंमत ५२ पौंड आहे.

# दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

**अध्यक्ष, श्री. व. प्र. पंडित, यांचे रविवार, दि. २५ सप्टेंबर १९६६ रोजी भरलेल्या ४८ व्या वार्षिक सभेतील भाषण :-**

आजच्या सभेच्या औपचारिक कामाला प्रारंभ करण्यापूर्वी बँकेचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. वामनराव वर्दे यांना धन्यवाद अर्पण करणे हे माझे कर्तव्य आहे. बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा श्री. वर्दे यांनी निष्ठेने आणि निरलसपणे तीस वर्षे वाहिली आणि या स्थानाला एक आगळे महत्त्व प्राप्त करून दिले. आपली बँक आज देशामध्ये सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रेसर आहे याचे श्रेय प्रामुख्याने श्री. वर्दे यांनी घालून दिलेले शिरस्ते आणि प्रघात आणि त्यांचे अनुभव आणि मौलिक मार्गदर्शन यांनाच आहे. बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, त्याचप्रमाणे मुख्य कचेरी व पुणे आणि बेळगाव येथील समितीतील सर्व सहकारी आणि कर्मचारी यांच्या वतीने मी श्री. वर्दे यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो व त्यांच्या प्रदीर्घ अनुभवांचा लाभ आणि त्यांचे बहुमोल मार्गदर्शन बँकेला मिळत राहील अशी आशा व्यक्त करतो.

जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार भारत सरकारने ६ जून १९६६ रोजी रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. आपल्या बँकेकडून आर्थिक साहाय्य घेत असलेल्या छोट्या उद्योगधंद्यांवर या अवमूल्यनाचा विपरीत परिणाम झाला आहे. आयात, कच्चा माल आणि यंत्रसामग्री यांवर होत असलेला त्यांचा खर्च ५७·५० टक्के वाढला आहे. परिणामी, या उद्योगधंद्यांना त्यांच्या गरजा पुरविण्यासाठी देण्यात येणाऱ्या कर्जाऊ रकमांमध्ये किमान तितकीच वाढ करणे जरुरीचे ठरले आहे. सामान्य माणसाच्या अंदाजपत्रकातही या अवमूल्यनामुळे उद्भवलेल्या किंमतवाढीची दुःस्थिती दृग्गोचर होते.

आजवर सामान्य माणसास घरबांधणी, ऋणविमोचन आणि अन्य नैमित्तिक गरजांसाठी पैसे देणे हे आपल्या बँकेचे वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्षेत्र होते. अलीकडे लघु उद्योगधंद्यांना लागणारे भांडवल पुरविण्याच्या नव्या क्षेत्रातही आपल्या बँकेने यशस्वी रीत्या पदार्पणप्रारंभ केला आहे. बँकेने या कार्यासाठी जी कर्जे दिली आहेत, त्यांपैकी रुपये ६५·०५ लक्ष, ९० उद्योगधंद्यांना दिले आहेत. एकूण दिलेल्या कर्जाच्या रकमेची ही रक्कम ३६ टक्के आहे. उरलेली ६४ टक्के कर्जे लहान लहान कर्जांमध्ये विभागली असून " छोट्या माणसांची मोठी बँक " हे आपल्या बँकेचे अभिधान त्यायोगे सार्थ होत आहे. वृत्तांताच्या वर्षी बँकेने खेळत्या भांडवलाची ५ कोटी रुपयांची सीमा ओलांडली आहे. ३० जून, १९६६ रोजी ही रक्कम रुपये ५·१४ कोटी होती. ठेवीची रक्कम रु. ४·६८ कोटी आहे. अहवालाच्या साली रु. २५·०१ लक्ष इतकी वाढ झाली, मागील वर्षी हीच वाढ रुपये २८·९० लक्ष इतकी होती. तथापि या वाढत्या ठेवींचा विनियोग या वर्षी कशा प्रकारे करण्यात आला याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. मागील वर्षी रु. २८·९० लक्षांनी ठेवी वाढल्या. परंतु तरते भांडवलही रु. २५·६८ लक्ष वाढले. म्हणजे या वाढत्या ठेवींपैकी फक्त ३·२२ लक्ष अधिक कर्ज देण्यासाठी वापरले गेले. या साली ठेवींमध्ये रु. २५·०१ लक्ष वाढ झाली. आणि त्याच काळात बँकेने दिलेल्या कर्जाची रक्कम लक्ष ३९·३४रु. नी वाढली, आणि वर्षाअखेर एकूण कर्जाची रक्कम १८३·५१ लक्ष इतकी झाली. बँकेकडे येणाऱ्या ठेवींचा विनियोग अशा प्रकारे उत्पादनाकडे व्हावा हा बदल स्वागतार्ह आहे असाच आपला अभिप्राय पडेल असा मला विश्वास वाटतो. बँक आपल्या निधीचा विनियोग करण्यासाठी नव्या नव्या क्षेत्रांत पदार्पण करीत आहे.

महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटी नियम १९६१ मधील नियम ३५ ( १ ) मुळे एक चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली आहे. या नियमान्वये, सहकारी बँकांनी स्वीकारावयाच्या ठेवींवर कमाल मर्यादा घालण्यात आली आहे. ती अशी की, भांडवल अधिक रिझर्व्ह फंड व इमारत फंड वजा तोटा यांच्या १२ पटींहून ठेवींची रक्कम अधिक असू नये. ती तशी असल्यास या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या ठेवींची रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविण्यात आली पाहिजे, आणि हे रोखे केंद्र सहकारी बँकेपाशी सुरक्षित ठेव म्हणून ठेवण्यात आले पाहिजेत.

आपल्या बँकेने ठेवीची ही कमाल मर्यादा केव्हाच ओलांडली आहे. आपल्या ठेवी या मर्यादेच्या जवळजवळ दुप्पट आहेत. वरील नियमानुसार यापुढे येणाऱ्या ठेवींची सर्व रक्कम सहकारी रोख्यांत गुंतविली पाहिजे. बँकेकडे येणाऱ्या ठेवींवर ४ ते ७ टक्के व्याज द्यावे लागते. सरकारी रोख्यांत ही रक्कम गुंतविल्यास त्यावर फक्त ४ ते ५ टक्के व्याज मिळते. परिणामतः स्वीकारलेल्या ठेवींवर १ ते २ टक्के तोटा सोसावा लागतो. बँकेच्या व्यवहारांच्या दृष्टीने ही स्थिती असमाधानकारक आहे, हे उघडच आहे.

या परिस्थितीवरील एक उपाय म्हणजे बँकेचे भांडवल वाढविणे. बँकेने या दिशेने यापूर्वीच पाऊले टाकली असून आपले अधिकृत भांडवल रु. १० लाखांवरून रु. २५ लाखांपर्यंत वाढविले आहे. तथापि भांडवल वाढविण्यालाही विशिष्ट मर्यादा असतातच. भांडवलावर काय उत्पन्न मिळते हे भागदार लोक नेहमीच पाहात असतात. सर्व परिस्थितीचा विचार केल्यास व्यवहार्य असा एकच उपाय दिसतो तो हा की ठेवींवरील मर्यादेचे प्रमाण हल्लीच्या १२ पटींऐवजी २० पट इतके वाढविण्याची मुभा असावी. अशा प्रकारे बँकेला परवानगी मिळाल्यास बँकेकडे येणाऱ्या अधिकाधिक ठेवींचा विनियोग सभासदांना कर्जे देण्यासाठी करता येईल.

अशाप्रकारे ही मर्यादा वाढवून मिळावी या करिता आपल्या बँकेने रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांजकडे विनंती सादर केली आहे. मला अशी आशा वाटते की, आमच्या अडचणींची योग्य कल्पना सहकारी खात्याला येईल आणि त्याजकडून आम्हांला इष्ट ते मार्गदर्शन मिळेल. असे झाल्यास, बँकेचे सभासद आणि विशेषतः छोटे उद्योगधंदे यांची सेवा करण्याचे आपल्या बँकेचे धोरण अमलात आणणे शक्य होईल.

बँकेचा अध्यक्ष या नात्याने माझ्या सेवेचे हे पहिलेच वर्ष. व्यवस्थापक मंडळावरील माझ्या सहकाऱ्यांनी मला संपूर्ण पाठिंबा देऊन उपकृत केले आहे. त्यांचा मी फार ऋणी आहे. तसेच, पुणे व बेळगाव येथील स्थानिक समित्यांच्या सभासदांचाही मी ऋणी आहे. त्यांच्या सभासदांची भेट घेण्याचा व बँकेचे धोरण आणि कार्यपद्धती यासंबंधी चर्चा करण्याचा सुयोग आला. बँकेच्या कर्मचारी वर्गाच्या निष्ठापूर्वक सेवेबद्दल त्यांना खास धन्यवाद देण्याची संधी मी या प्रसंगी घेत आहे. विशेषतः श्री. शं. वि. संझगिरी, श्री. नि. रा. वरेरकर व श्री. दे. प्र. कानविंदे यांच्या कामगिरीचा खास निर्देश करणे मला आवश्यक वाटते. सर्वच अधिकारीवर्ग व अन्य कर्मचारीवर्ग यांनी दक्षतेने काम केले; भावी काळातही बँकेचे पाऊल अधिक जोमाने पुढे पडण्यासाठी या सर्वांचे सहकार्य मिळत राहील याबद्दल मला पूर्ण खात्री आहे.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

### जनरल मॅनेजर श्री. सी. ह. जोशी ह्यांचा सेवकांतर्फे सत्कार

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. चे जनरल मॅनेजर, श्री. सी. ह. जोशी यांना संस्थेच्या सेवकांतर्फे सेवानिवृत्तिप्रीत्यर्थ निरोप देण्यात आला. संचालक मंडळाचे सभासद, श्री. भाऊसाहेब मोडक अध्यक्षस्थानी होते. संस्थेच्या सत्तावीस शाखांतून बरेच सेवक मुद्दाम उपस्थित होते.

प्रारंभी मुंबई शाखाधिकारी, श्री. ना. गं. मोघे, यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर अनेक शाखाधिकारी यांनी श्री. जोशी यांचा गौरव केला. सेवकांतर्फे चांदीचा पानाचा डबा, आदी वस्तू त्यांना भेट दिल्या. बँकेचे नवे प्रमुख व्यवस्थापक ( जनरल मॅनेजर ) श्री. वि. श्री. दामले यांचेही भाषण झाले. श्री. जोशी यांनी समारंभाबद्दल व गौरवोद्गाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. नोकर सहकारी पतपेढीची वार्षिक सभा भरली होती. अध्यक्षस्थानी श्री. सी. ह. जोशी होते. श्री. जोशी निवृत्त होत असल्याने त्यांचा सत्कार नवे अध्यक्ष श्री. वि. श्री. दामले यांचे हस्ते करण्यात आला.

श्री. जोशी यांचे प्रयत्नांमुळे सदरची संस्था प्रगतिपथावर आहे. त्यांनी संस्थेला रु. १००१ ची देणगी दिली. ह्या बँकेच्या सेवकास स्वतःवरील शस्त्रक्रियेसाठी मदत लागली तर ती ह्या रकमेच्या व्याजातून करावी असे त्यांनी सांगितले व व तशी तरतूद सोसायटीने करण्याचे ठरविले आहे. श्री. कृ. व्यं. जोशी यांची पुन्हा चिटणीसपदी सर्वानुमते निवड झाली.

---

### ट्रॅक्टर्सच्या सुट्या भागांचा कारखाना

मद्रासजवळ ट्रॅक्टर्स, मोटार इत्यादी अवजारांना लागणारे सुटे भाग तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यात येणार आहे. अशा अवजारांतून वापरण्यात येणाऱ्या पोलादी साखळ्याही कारखान्यात तयार करण्यात येणार आहेत. एका सुप्रसिद्ध इटालियन कंपनीने तांत्रिक साह्य देण्याचे कबूल केले आहे. सध्या अशा प्रकारच्या साखळ्या व इतर सुटे भाग आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर परदेशीय चलनाचा खर्च करावा लागतो. कारखाना उभारण्यासाठी ११२ लाख रुपये भांडवल लागणार आहे. ह्या आकड्यात खेळत्या भांडवलाचाही समावेश आहे. उभारणीचे काम चालू झाले असून ते बहुधा चालू वर्षअखेर अगर पुढील वर्षाच्या प्रारंभी पूर्ण होईल.

---

### कोचीनची बोटी बांधण्याची परंपरा

कोचीनमध्ये बांधण्यात यावयाच्या बोट बांधणीच्या कारखान्याच्या रूपाने तेथील प्राचीन परंपरा पुन्हा चालू होणार आहे. १५ व्या शतकात एका पोर्तुगीज कॅप्टनने आपल्या १३ बोटींची दुरुस्ती ह्या बंदराचा आश्रय घेऊन केली. १६ व्या शतकापासून अठराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत कोचीनमधील बोटी बांधण्याचा व दुरुस्ती करण्याचा धंदा चांगला चालला होता. कोचीन बंदरात व्यापारी गलबताप्रमाणे आरमारी बोटीही बांधण्यात येत असत. १९ व्या शतकाच्या मध्यापासून मात्र युरोपमधील बोटी बांधणाऱ्या कारखान्यांची स्पर्धा कोचीनमधील धंद्याला जाणवू लागली. ब्रिटिश राजवटीत ह्या धंद्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले आणि तेव्हापासून तो बुडण्याच्या मार्गाला लागला.

### राजकीय अस्थैर्याचा खतांच्या कारखान्यांवर परिणाम

भारतामधील अन्नधान्याचे उत्पादन वाढवून देश स्वावलंबी करण्याच्या प्रयत्नात रासायनिक खतांच्या कारखान्यांना असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. रासायनिक खतांचे कारखाने स्वतःच्या साधनसामग्रीतून काढण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे आणि अन्नधान्याच्या उत्पन्नाच्या वाढीचा प्रश्न निकराला आला असल्यामुळे परदेशांची मदत घेण्याशिवाय अन्य मार्ग राहिलेला नाही. त्या दृष्टीने अमेरिकन कंपन्यांची मदत मिळण्यासाठी ह्या वर्षी वरिष्ठ भारतीय अधिकाऱ्यांचे एक मंडळ तिकडे गेले होते. मंडळाने काही अमेरिकन पेट्रोल कंपन्यांशी चर्चा करून भारतात खतांचे कारखाने काढण्यासंबंधी उपयुक्त प्राथमिक काम केले होते. खतांचे कारखाने उभारण्यात आल्यास त्यांना ५ वर्षेपर्यंत संपूर्ण धंदेवाईक स्वातंत्र्य देण्यात येणार होते. खतांच्या कारखान्यांत अमेरिकन भांडवल गुंतविण्यास अनुकूल परिस्थिती आहे, असा विश्वासही अमेरिकन कंपन्यांना वाटत होता. परंतु आता हे चित्र पालटले आहे. निदान दोन अमेरिकन पेट्रोल कंपन्यांनी आता अशी भाषा सुरू केली आहे की, भारतामधील राजकीय अस्थैर्य लक्षात घेता १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यावरच खतांच्या कारखान्यांबद्दल अंतिम निर्णय घेणे सोईचे होईल. निवडणुका होऊन गेल्यावर जे नवे सरकार अधिकारावर येईल, ते सध्याच्या सरकारची खतकारखान्यांसंबंधीची धोरणे तशीच चालू ठेवील ह्या विषयी खात्री पटणे तेव्हाच शक्य होईल; शिवाय अमेरिकन कंपन्या भारतामधील ज्या कंपन्यांशी सहकार्य करणार आहेत त्या कंपन्यांची निवडही अजून झालेली नाही.

---

### पोस्टात अधिक ठेवी आकर्षित होऊ शकतील

पोस्ट अँण्ड टेलिग्राफ बोर्डावरील एक सभासद श्री. एस. सी. जैन ह्यांनी पोस्टात अधिक प्रमाणात ठेवी जमा करता येणे शक्य आहे असा अभिप्राय व्यक्त केला आहे. पोस्टाच्या शाखांतून सेव्हिंग्ज बँकांचे काम करण्यात येते. त्यांत काम करणाऱ्या पोस्टमास्तरांना जर काही प्रलोभने ठेवण्यात आली तर लोकांपासून सध्यापेक्षा २५ ते ५० टक्के अधिक ठेवी आकर्षित करता येतील, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ते पुढे म्हणाले की, अधिक ठेवी आकर्षित करण्यासाठी पैसे काढण्याच्या व ठेवण्याच्या सोयी अधिक चांगल्या करण्यात आल्या पाहिजेत आणि पोस्टातील वातावरणही अधिक उल्हासित राखण्यात आले पाहिजे. खरे म्हणजे पोस्ट ऑफिस ही संस्था आजच देशातील सर्वात मोठी बँकिंगची संघटना आहे. कारण पोस्ट ऑफिसातील ठेवी सुमारे १,५४६ कोटी रुपयांच्या आहेत. व्यापारी बँकातील ठेवी सुमारे २,९३५ कोटी रुपयांच्या आहेत. देशातील बँकांत असलेल्या एकूण ठेवींशी पोस्टातील ठेवींची टक्केवारी ३० टक्के आहे. पोस्टात पैसे ठेवणाऱ्या खातेदारांची संख्या २ कोटी आहे; म्हणजे एका अर्थाने पोस्ट ऑफिस ही संस्था जनता बँकच म्हणावयास हरकत नाही. भारतामधील एकूण पोस्टांच्या शाखांची संख्या ८६ हजार आहे. त्यांपैकी ५३,४०० शाखा सेव्हिंग्ज बँकांचे काम करतात. सुमारे ४० हजार शाखा ग्रामीण भागात काम करीत असून तेथील लोकांना बँकिंगच्या सवलती उपलब्ध करून देतात आणि व्यापारी बँकांचे हात पैशाच्या ज्या उगमापर्यंत पोचत नाहीत तेथे प्रवेश करून पैसे एकत्र करण्याचे काम करतात.

# श्री. स. ना. ऊर्फ बापूसाहेब सणस



लेखक :—श्री. जी. के. शिंदे, बी. ए., सेक्रेटरी,
ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटी, पुणे.

रात्रीचे दहा वाजून गेले होते. आता बहुधा येत नाहीत या भावनेने मी उठलो आणि इतक्यात ओळखीच्या हॉर्नचा आवाज कानी आला. एक जीप कार बंगल्यासमोर थांबली आणि त्यातून बापूसाहेब उतरले.

बापूसाहेब, खर म्हणजे यांचे नाव सखाराम नारायणराव सणस, पण सर्वत्र ते बापूसाहेब, बापू या नावानेच परिचित आहेत. महाराष्ट्राच्या सचिवालयात जा किंवा डोंगराच्या कपारींत लपलेल्या पुणे जिल्ह्यांतील कोणत्याही आडवळणी खेड्यात जा, सामान्य मजुरापासून ते दैनंदिन लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या व्यापाऱ्यापर्यन्त, बापूसाहेबांचे नाव परिचित नाही अशी व्यक्ती विरळीच.

सडपातळ अंगकाठी, मध्यम उंची आणि गौरवर्ण, बापूसाहेबांची ही मूर्ती तुमचे नजरेत सदैव राहू शकेल. साधी पॅन्ट, तीत खोवलेला हाफशर्ट व तीवर भरपूर रुंद पट्टा, डोक्यावर हॅट, असा साधाच पण आधुनिक धाटणीचा त्यांचा हा नेहमीचा पोषाख पाहून तर आपण एकदा अमेरिकन शेतकरी तर पाहात नाही ना असा क्षणभर भास मला कित्येक वेळा झाला असेल.

जीपमधून उतरताच मला पाहिले आणि स्मित हास्याने माझे स्वागत केले.

काय काम काढलय आज ? त्यांनी मला पृच्छा केली आणि दिवसभराचे शेतीकामाने थकलेले असतील या भावनेने माझे काम टाळण्याचा प्रयत्न करीत असताच 'चला' या त्यांच्या आवाहनाने त्यांचे मागोमाग मी दिवाणखान्यात जाऊन बसलो.

सत्तरीच्या जवळपास आलेले बापूसाहेब–दिवाणखान्यातील त्यांच्या ऐन उमेदीच्या कालात रेखाटलेल्या भव्य तैलचित्राकडे पाहात इतिहास आठवू लागला–आजही तरुणांना लाजवतील असे कष्ट करीत आहेत. सकाळी ६ वाजता उठून आपल्या शेतीकडे जे प्रयाण करतात ते घरी परततात रात्री ९–१० वाजता.

सिंहगड रस्त्याला लागून असलेल्या वडगाव खुर्द गावी चला बापूसाहेबांची शेती पाहायला आणि आदर्श शेती म्हणजे काय चीज असते याची खात्री करून घ्या. तुम्ही अचानक गेला तर २००–३०० एकरांच्या परिसरात विखुरलेल्या या विस्तीर्ण शेतीत कोठेतरी बापूसाहेब त्यांचे नेहमीचे पोषाखात आणि हातात काठी घेऊन उन्हात, पावसात उभे ठाकलेले दिसतील. पाटातून वाहणाऱ्या पाण्याचा खळखळाट, पक्षांचा किलबिलाट आणि वाऱ्याचा सनसनाट या संगीतमय वातावरणात, गीतेत वर्णिलेल्या स्थितप्रज्ञाप्रमाणे !

तुम्ही त्यांचेजवळ गेलात की, स्मित हास्याने तुमचे स्वागत होईल आणि कामाची विचारणा झाल्यानंतर किंचितशी तपकीर ओढून अगदी हौसेने, अभिमानपूर्वक ते त्यांच्या आदर्श शेतीची माहिती देतील. अनेक विहिरींचे पाणी एकत्र करून ते सबंध शेतात कसे खेळविले आहे, उत्कृष्ट रंगाचा आणि चवीचा गूळ कसा तयार केला जातो याची प्रात्यक्षिके दाखवितील, बंगल्याकडे नेऊन तेथील माल साठविण्याकरिता शास्त्रोक्त पद्धतींनी बांधलेली गोडाउन्स, अजस्र ट्रॅक्टर्स दाखवितील आणि तुम्ही काहीही निमित्त केले तरी दुग्धपानाशिवाय तुमची सुटका केली जाणार नाही.

एक आदर्श शेतकरी म्हणून बापूसाहेब अलीकडच्या काळात प्रसिद्धीस आले. तथापि त्यांच्या ऐन उमेदीच्या कालात ते प्रसिद्ध होते एक काँग्रेस अनुयायी, धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते व धाडशी शिकारी म्हणून. तसे म्हणाल तर सबंध सणस घराणेच सामाजिक कार्याबद्दल प्रसिद्ध आहे. त्यांचे धाकटे बंधू बाबूराव सणस यांचेभोवती आजही पुण्याचा इतिहास घुटमळत आहे. आयुष्याच्या ऐन तारुण्यात बापूसाहेबांनी पुणे जिल्हा लोकलबोर्ड, तेव्हाची पुणे नगरपालिका इत्यादी अनेक महत्त्वाच्या संस्थांचे नेतृत्व केले आणि ब्रिटिशांच्या हुकुमशाही राजवटीतही त्या संस्था जागृत ठेवल्या. काँग्रेस पक्षातील अलीकडील एकंदरीत वातावरणावर आणि ध्येय धोरणावर बापूसाहेब अधूनमधून टीकास्त्रही उपसतात, पण त्यांच्या या टीकेला उत्तर देण्याचे सामर्थ्य अथवा धाष्टर्य नव्या पिढीतील कोणीही कार्यकर्ता करू शकत नाही.

आर्थिक हलाखीने आणि अज्ञानाने ग्रामीण जनतेचे सुकलेले चेहरे बापूसाहेबांना पाहात राहणे शक्य नव्हते. त्याकरिता त्यांनी तालीमी स्थापन केल्या. धष्टपुष्ट अंगकाठीचे तेजवान युवक निर्माण केले आणि त्या सतेज चेहऱ्यांवर विद्येची लकाकी दिसण्याकरिता त्यांनी आपली १४ एकर जमीन रयत शिक्षण संस्थेस देऊन आपले गावी विद्यार्जनाची सोय करून दिली. शेतात काम करणारा मजूर, कार्यालयातील कर्मचारी, कोणाकरिताही मदतीचा हात त्यांनी मागे घेतला नाही. या बाबतीत मला एक प्रसंग आठवतो. ऑफिसमधील सेवकांनी ॲडव्हान्स मिळणेकरिता ऑफिसकडे अर्ज केला होता. ऑफिसतर्फे ॲडव्हान्स देता येईल किंवा नाही अशी कायदेशीर अडचण निर्माण झाली. तेव्हा बापूसाहेब म्हणाले, "कायद्याचा कीस काढण्याचे भानगडीत पडू नका. ऑफिसतर्फे देता येत नसेल तर मजजवळून घेऊन जा." बापूसाहेबांच्या औदार्याची अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. काही वर्षांपूर्वी त्यांनी सुमारे ७२ गावांची एक सोसायटी स्थापन करून त्या संस्थेमार्फत सामुदायिक विवाहाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडून अनेक गरीब युवकांचे संसार उभारून दिले आहेत.

बापूसाहेब पूर्वी भवानी पेठेत राहात. भवानी पेठ ही शेतीमालाची ठोक बाजारपेठ. शेतीमालाची विक्रीचे वेळी होणारी अनास्था आणि त्यामुळे शेतकऱ्यांवर बसणारा आर्थिक भूर्दन्ड त्यांच्या सूक्ष्म बुद्धीतून सुटला नाही. या बाजारपेठेस मार्केटस् ॲक्ट लावून घेण्याचे त्यांनी अव्याहत परिश्रम केले आणि त्यांच्या प्रयत्नांस यश येऊन सन १९५९ सालापासून

मार्केट कमिटीची स्थापना झाली. तेव्हापासून ते आजतागायत ते या संस्थेचे चेअरमन आहेत. आणि त्यांचे मार्गदर्शनाखाली आता शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे भाव उघड लिलावाने ठरू लागले. त्यांच्या मालाचे वजनमाप बिनचूक आणि त्वरित होऊन घट, तूट, फूट यांमुळे होणारी आर्थिक नुकसानी टळली. वजनमाप झाल्याबरोबर कमीतकमी विक्रीखर्च वजा होऊन मालाच्या किमतीची उर्वरित रक्कम लागलीच रोख मिळू लागली. याच बाजारपेठेत पूर्वी शेतकऱ्यास त्याच्या १०० रुपये किमतीचे मालाची विक्री करण्यास ६ रुपये खर्च येई. तो आता फक्त २ रुपये येत आहे व अशा तऱ्हेने या बचत झालेल्या शेकडा ४ रुपयांप्रमाणे प्रतिवर्षी ८ लक्ष रुपये शेतकऱ्यांच्या खिशांत पडत आहे. इतर अनेक नियमित बाजारपेठांतील अनुभव लक्षात घेता मार्केट कमिटी व व्यापारी यांचेमध्ये सतत वादविवाद चालू असलेला दिसून येईल. तथापि या ठिकाणी तुम्हांला तसे काहीच आढळणार नाही, त्याचे कारण बापूसाहेब. शेतकरी आणि व्यापारी या दोन्ही प्रवृत्तींचा संगम असलेले बापूसाहेब अद्यापिही ते या योजनेच्या उत्कर्षार्थ अविरत परिश्रम घेत आहेत. पश्चिमेस पुणे सातारा रोड गुल्टेकडी परिसरांत अकायर केलेल्या १५० एकरांच्या विस्तीर्ण जागेत शास्त्रशुद्ध मांडणीची भव्य बाजारपेठ उभारली जात आहे, तर पूर्वेस सहकारी साखरकारखाना उभारण्याच्या नौबती झडत आहेत.

"काय, तुमच्या गावाला झाला का पाऊस?" या बापूसाहेबांच्या प्रश्नाने विचारधारा थांबल्या. नकारार्थी मान हलवीत मी सह्यांचे कागद पुढे केले. सह्या झाल्या आणि त्याबरोबर चहापानही. "पाऊस जर आला नाही तर माणसांपेक्षा जनावरांचे जास्त हाल होतील. वैरण न मिळाल्याने उपाशी तडफडून ती मरतील." बापूसाहेब म्हणू लागले आणि मी काहीतरी अभिप्राय व्यक्त करणार इतक्यात बापूसाहेबांनी कल्पना सुचविली. "तेव्हा या वैरणीचा काटकसरीने वापर करण्याकरिता राज्य सरकारने प्रत्येक ग्रामपंचायत अथवा सोसायटीस कुटीचे मशीन घेण्यास उद्युक्त केले पाहिजे." "खरंच आवश्यक आहे." मी म्हणालो आणि तसे एक पत्र मुख्य मंत्र्यास लिहावयास मला सांगितले.

मला झोपेने घेरले होते आणि म्हणून मी जाण्याचे तयारीत होतो. पण बापूसाहेबांना कुठली झोप! छोट्या नातवंडांशी गप्पा मारण्यात आणि उद्या शेतावरून परत येताना कोणकोणत्या वस्तू त्यांचेसाठी आणणार याची अभिवचने देण्यात ते केव्हाच रंगून गेले होते.

**इंडियन एअर लाइन्ससाठी विमाने**—इंडियन एअरलाइन्स कंपनीने कानपूर येथे तयार करण्यात येणाऱ्या ॲव्हरो ७४८ ह्या जातीच्या १५ विमानांची मागणी नोंदविली आहे. त्यापैकी पहिले विमान पुढील मार्च महिन्यात कंपनीला देण्यात येईल. १९६९ अखेरपर्यंत सर्व विमाने हाती येतील. हवाई चाचणीत ती यशस्वी ठरली आहेत. प्रत्येक विमानाची किंमत सुमारे ७५ लाख रुपये आहे.

**इन्शुलिनचे कृत्रिम उत्पादन**—मधुमेहावर गुणकारी असणारे इन्शुलिन हे औषध कृत्रिमरीत्या तयार करण्यात चिनी शास्त्रज्ञांना यश मिळाल्याची वार्ता आहे. आतापर्यंत ते तयार करण्यासाठी प्राणिज ग्रंथींचा उपयोग करावा लागत असे. चिनी शास्त्रज्ञांच्या या दाव्याला पश्चिम जर्मनीतील शास्त्रज्ञांनीही पाठिंबा दिला आहे. अमेरिकेतील पेनसिलव्हानिआ विद्यापीठाच्या संशोधक प्रमुखानेही ह्या वार्तेला दुजोरा दिला आहे.

**जमिनीच्या बांधबंदिस्तीचे काम**—मराठवाड्याच्या परभणी जिल्ह्यात १९६४ सालापासून जमिनीची धूप थांबविण्यासाठी बांधबंदिस्तीच्या कामाला आरंभ करण्यात आला. आतापर्यंत १·१२ लाख एकर जमिनीचे अशा तऱ्हेने संरक्षण करण्यात आले आहे. ह्या कामासाठी आतापर्यंत ४८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. परभणी जिल्ह्यातील २० लाख एकर जमिनीला योजनेचा फायदा मिळणार आहे.


BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

(१) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
(२) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
(३) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.